# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला , सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001Website:www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- 022 22611015


मराशुपशिमं/परिक्षा अर्ज/4674/२०२२ दिनांक :- १३/०९/२०२२

प्रति,
प्राचार्य/परिचर्या अधिकारी/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्न परिचारीका प्रशिक्षण संस्था

विषय : **मुदतवाढ** - शैक्षणिक वर्ष **२०२१-२२** जी.एन.एम. **तृतीय** वर्ष व पोस्ट बेसिक डिप्लोमा कोर्स नियमित परिक्षेसाठी विदयार्थ्यांचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज, परिक्षा शुल्क अंतर्गत टर्म मुल्यमापन बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व सलंग्नीत महाविदयालयातील संस्थाप्रमुख व प्राचार्यांना कळविण्यात येते की शैक्षणिक वर्ष २०२१-२२ जी.एन.एम. तृतीय वर्ष कोर्स नियमित परिक्षेसाठी परिक्षेसाठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळाने ऑनलाईन परिक्षा फॉर्म उपलब्ध केलेले आहेत. संस्थांनी परिक्षेचे फॉर्म ऑनलाईन पध्दतीने **१४/०९/२०२२ ते १६/०९/२०२२** पर्यंत भरावेत. ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरताना खालील पध्दतीचा वापर करावा:

विदयार्थी परिक्षा नोंदणी ( Student Exam Enrollment)-२०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी Student Exam Enrollment साठी वापरण्यात आलेल्या User ID व Password वापरण्यात यावा. विदयार्थ्याचा पी.आर.एन. क्रमांक टाकून विदयार्थी परिक्षा नोंदणी करावी.

विदयार्थी परिक्षा अर्ज ( Online Exam Application ) - विदयार्थी परिक्षा नोंदणी झाल्यानंतर सर्व विदयार्थ्यांचे परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने पी.आर.एन. क्रमांक टाकून अर्ज करावयाचे आहेत.

परिक्षा शुल्क दिनांक **१४/०९/२०२२ ते २०/०९ /२०२२** पर्यंत भरण्यात यावे. शुल्क भरताना खालील पध्दतीचा अवलंब करावा.

परिक्षा शुल्क भरण्याबाबत- परिक्षा शुल्क भरण्यासाठी पेमेंट मेनू मध्ये जाऊन Pay Online (Blue Button ) वरती क्लिक करुन Payment करावे. NEFT/RTGS/DD या पद्धतीने केलेले परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही याची सर्व संलग्नीत संस्थानी नोंद घ्यावी.

अंतर्गत टर्म नुसार मूल्यमापन गुणांची नोंदणीबाबत - सदर परिक्षेसाठी फ्रेशर ( म्हणजेच जुन्या बॅचचे असे विदयार्थी ज्यांनी सदर परीक्षा दिली नाही )असणाऱ्या विदयार्थ्यांचे टर्म १ व टर्म २ अंतर्गत मूल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक २०/०९/२०२२ ते २८/०९/२०२२ पर्यंत करण्यात यावी.

अंतिम अतंर्गत मुल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक २८/०९/२०२२ ते ०३/१०/२०२२ पर्यंत करावी.
विहित कालावधीत वरील बाबी पूर्ण न केल्यास विदयार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्था जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

टिप : १. काही अडचणी आल्यास पुढील दुरध्वनी क्रमांकावर सपर्क करावा- ८९७६२७९९३१

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळ

प्रत :

१.मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळ,मुंबई
२.मा.विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळ, मुंबई